# उच्च शिक्षणासाठी मुकूल माधव फाऊंडेशनने दिले आर्थिक पाठबळ

● पुणे । प्रतिनिधी

उच्च शिक्षण घेऊन कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलण्याचे, आयुष्यात यशस्वी होणे हे विद्यार्थीदशेत असणाऱ्या प्रत्येकाचे स्वप्न असते. दहावीची परीक्षा देऊन, आयुष्याच्या नव्या टप्प्याला सामोरे जाण्याचे स्वप्न बघणारा विश्वास शिंदे हा असाच एक हुशार विद्यार्थी.

दुर्दैवाने नववीत असताना विश्वासला मम्प्स अटॅकचा सामना करावा लागला, ज्यामुळे त्याला कायमचे बहिरेपण आले. बेताची आर्थिक परिस्थिती आणि कायमच्या बहिरेपणाचे अनपेक्षित संकट, या सत्याचा धीराने सामना करत विश्वासने दहावीची परीक्षा ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण केली आणि रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल इंजिनियरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. शारीरिक अडचणींचा सामना करतच उच्च शिक्षंणाचा प्रवास सुरु केलेल्या विश्वासला मुकूल माधव फाऊंडेशनने आर्थिक पाठबळ देत त्याला आधार दिला आहे.

रत्नागिरी येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेतल्यानंतर विश्वासची समस्या प्रा. बेळवालकर यांच्या लक्षात आली. मात्र, यासंबंधित अधिक तपासण्या करण्यास सांगितल्यावर त्याला कॉक्लिअर इम्प्लांट उपचार आवश्यक असल्याचे निदान करण्यात आले. डॉ. एम.व्ही. हिंदुजा हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. किर्तने यांनी विश्वासाची तपासणी करून कॉक्लिअर प्रत्यारोपण करण्यापूर्वी काही चाचण्या करण्यास विश्वासला सांगितले. यावेळी डॉ. क्षमा कोवाळे यांनीही विश्वासला मदत केली. शस्त्रक्रियेतील महत्त्वाची अडचण होती ती कॉक्लिअर यंत्र बसविण्यासाठी येणारा खर्च. यासाठी डॉ. किर्तने यांनी मुकूल माधव फाऊंडेशन मदतीसाठी बोलावले. मुकूल माधव फाऊंडेशनने नेहमीप्रमाणे कोणताही विलंब न लावता ५.५ लाख रुपयांची देणगी दिली. त्यामुळे विश्वास शिंदे यांची श्रवणशक्ती पूर्ववत करण्यास मदत झाली. मुकूल माधव फाऊंडेशन एक पाऊल पुढे जात त्याला मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये बी. ई. करण्यासाठी तीन वर्षेदरवर्षी वीस हजार रुपये देऊन त्याच्या शिक्षणालाही प्रोत्साहन दिले. विश्वासनेही हे प्रोत्साहन सार्थ करत फिनोलेक्स अॅकेडमी ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी (एफएएमटी) मधील अभियांत्रिकी परीक्षा प्रथम श्रेणीने उत्तीर्ण केली.